# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
"सिंचन भवन", जालना रोड, औरंगाबाद-431 005
दूरध्वनी क्र.(थेट) (0240) -2342096, कार्यालय 2342097, फॅक्स 2332426
E-mail-edgmidc.abadwrd@maharashtra.gov.in


## परिपत्रक

**विषय :** महामंडळाने वितरीत केलेल्या निधी चे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बाबत. (**Utilization Certificate** )

**संदर्भ :** : 1. महामंडळाचे परिपत्रक क्रं.गोमपाविम/लेखा-6/4532, दिनांक 13-5-2016.
2. मा.का.संचालक यांचे अध्यक्षतेखाली दि.11-5-2018 रोजी मंडळ व विभागीय स्तरावर भुसंपादनाच्या शिल्लक निधी बाबत आयोजित बैठक.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,महामंडळाने वितरीत केलेल्या निधीचे पतपत्रनिहाय उपयोगिता प्रमाणपत्र महामंडळास सादर करणे आवश्यक आहे. तथापि असे उपयोगिता प्रमणपत्र संबंधित अधिक्षक अभियंता यांच्याकडून प्राप्त होत नाही. तसेच काही प्रकरणात महामंडळाने वितरीत केलेला निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत केला आहे त्यासाठी वितरीत न करता अन्यत्र वितरीत केला जातो अथवा मंडळ/विभागीय कार्यालय स्तरावर अखर्चित स्वरुपात बँकेमध्ये चालू खात्यात ठेवला जातो,ही अत्यंत गंभीर वित्तीय अनियमितता आहे. महामंडळाच्या प्रत्येक निधी वितरण आदेशामध्ये (LOC) जर वितरीत निधी 7 दिवसांमध्ये खर्च झाला नाही तर महामंडळाच्या खात्यामध्ये निधी वर्ग करण्याच्या सुचना दिलेल्या असताना यावर कार्यवाही होताना दिसून येत नाही.

त्याअनुषंगाने यापूढे महामंडळास सादर करण्यात येणा-या निधी मागणी सोबत, महामंडळाने मागिल महिन्यात एकूण वितरीत केलेल्या निधीचे पतपत्रनिहाय उपयोगिता प्रमाणपत्र (LOC निहाय) धनादेश क्रमांक,रोख प्रमाणक क्रमांक (C.V.No.) इत्यादी सह व काही कारणास्तव निधी शिल्लक राहात असेल तर कारण मिमांसेसह पुढील महिन्यात सादर करण्यात येणा-या निधी मागणी सोबत जोडण्यात यावे. मागील महिन्यात वितरीत सर्व पतपत्राचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास निधी मागणी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येणार नाही. या कारणांमूळे झालेल्या सर्व विलंबाची जवाबदारी संबंधित अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांची राहील.

**सोबत: उपयोगिता प्रमाणपत्राचा नमुना**

**(अ.बा.तारे)**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**

**स्थळप्रत का.सं. यांचे स्वाक्षरीत/-**

जा.क्र. गोमपाविम/लेखा-8/4904 दिनांक :-02.06.2018

**प्रत,**

अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ,औरंगाबाद
अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड
अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड
अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वै)
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड
अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर
महामंडळ मुख्य कार्यालयातील लेखा शाखा- 1,2,3,4,5,6,7,9,10 यांना माहिती व कार्यवाहीस्तव.